# तुरुंग अधिकारी.

**१.सीआर/३०१/मुंबई/१४(** तुरुंग अधिकारी बुरकुले)

फिर्यादी हे तुरुंग अधिकारी श्रेणी २ या पदावर मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे कार्यरत आहेत. या पदावर नियुक्ती झाल्यानंतर या पदाची खातेअंतर्गत परीक्षा उतीर्ण होणे आवश्यक असते. फिर्यादीने ही परीक्षा दिली असून नमूद परीक्षेतील ४ पेपर्स पैकी १ पेपर आलोसे क्र.१ वासुदेव दिंगबर बुरकुले, अधीक्षक, ऑर्थर रोड, मध्यवर्ती करागृह, वर्ग १ यांचेकडे आला होता. या पेपरमध्ये मार्क वाढवून पास करण्याकरीता दिनांक १६/०४/२०१४ रोजी आलोसे क्र.१ यांनी रु. ४०,०००/— लाचेची मागणी केली होती. तडजोडी अंती आलोसे क्र.१ वासुदेव बुरकुले यांच्या सांगण्यावरुन आलोसे क्र.२ प्रदीप अण्णासाहेब पाथ्रीकर, उप अधीक्षक, ऑर्थर रोड मध्यवर्ती करागृह यांनी रु.३५०००/— लाच स्वीकारली. सदरबाबत मुंबई विभाग, ॲन्टी करप्शन ब्युरो २८/२०१४ कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून दोन्ही आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयात अटक आरोपी लोकसेवक क्र.१ वासुदेव दिंगबर बुरकुले याचे घरझडतीमध्ये रु. ४० लाखाची मालमत्ता व चौकशीमध्ये रु.१.२५ करोडची **अपसंपदा** संपादित केल्याप्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.